# रेशीमशास्त्र पदव्युतर पदविका, पदविकाच्या परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ रेशीमशास्त्र पदव्युतर पदवी आणि पदविका अभ्यासक्रम परीक्षांना सुरुवात झाली असून दि. १८ मेपर्यंत या परीक्षा चालणार आहेत.

२०१८-१९ च्या परीक्षा दि. १३ मे पासून सुरू झाल्या आहेत. प्रात्यक्षिक व प्रकल्पसाठी केंद्रीय रेशीम मंडळाचे अधिकारी शेतकऱ्यांची परीक्षा सादरीकरण पाहणार आहेत, अशी माहिती डॉ. ए. डी. जाधव यांनी दिली.

My Kolhapur Edition
15 May, 2019 Page No. 4
Powered by : erelego.com

# महाविद्यालयांना निधीचा बूस्ट

## विद्यापीठातर्फे ११ लाख निधी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या महाविद्यालयांसाठी शिवाजी विद्यापीठातर्फे महाविद्यालय अर्थसहाय्य योजनेतंर्गत ११ लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पारंपरिक अभ्यासक्रमांचे शिक्षण देणाऱ्या ११ महाविद्यालयांचा यामध्ये समावेश आहे.

ज्या महाविद्यालयांची इमारत सुसज्ज आहे, वर्ग चांगले आहेत, तसेच मुलभूत सुविधांसाठी पूरक वातावरण आहे, मात्र आर्थिकदृष्ट्या अक्षम आहेत, अशा महाविद्यालयांसाठी शिवाजी विद्यापीठातर्फे २०१२ पासून अर्थसहाय्य योजना राबवली जाते. २०१२ ते २०१८ या कालावधीत ३७ लाख रूपयांचा निधी जवळपास २२ आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांना देण्यात आला होता. या अर्थसहाय्यामुळे त्या महाविद्यालयांना चांगला फायदा झाला. यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागवण्यात आले होते. प्रस्तावातील मागणीनुसार प्राधान्यक्रमाच्या तत्वावर अर्थसहाय्य देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.अर्थसहाय्यासाठी ग्रामीण व दुर्गम भागातील महाविद्यालयांचा प्राधान्याने विचार करण्यात येणार आहे.

अनुदानासाठी पात्र ठरलेल्या ११ महाविद्यालयांपैकी सांगली जिल्ह्यातील चार, कोल्हापूर जिल्ह्यातील पाच तर सातारा जिल्ह्यातील दोन महाविद्यालयांचा समावेश आहे.

अर्थसहाय्य योजनेच्या पात्रतेसाठी विद्यापीठातर्फे निकष निश्चिती करण्यात आली आहे. यामध्ये प्रस्ताव देणारे महाविद्यालय कायम विनाअनुदानित किंवा अंशतः विनाअनुदानित असणे आवश्यक आहे.

महाविद्यालयाची स्थापना होऊन तीन वर्षांचा कालावधी पूर्ण असला पाहिजे. कला, विज्ञान व वाणिज्य यापैकी पारंपरिक शाखा सुरू असणे आवश्यक आहे. महाविद्यालयाने विद्यापीठाच्या शुल्काचा भरणा नियमित केलेला असावा तसेच नॅक मूल्यांकनाला प्राधान्य देण्यात येणार आहे.

### कॉलेजनिहाय मंजूर झालेला निधी

- वाय. डी. पाटील कॉलेज, (यवलूज): ७५ हजार रू.
- विठ्ठल पाटील कॉलेज, (सलगरे, जि. सांगली):अडीच लाख रू.
- लहू परितकर कॉलेज, (पणोरे) : ७५ हजार रू.
- प्रा. संभाजीराव कदम कॉलेज, (देऊर,जि. सातारा): ७५ हजार रू.
- शिवशाहू कॉलेज, (सरूड, जि. कोल्हापूर): १ लाख रू.
- महिला कॉलेज (कसबा बीड, जि. कोल्हापूर): एक लाख रू.
- व्ही. के. चव्हाण पाटील कॉलेज (कारवे, जि. कोल्हापूर) एक लाख रू.
- रावसाहेब पाटील कॉलेज ( सावळज, जि. सांगली) :७५ हजार रू.
- म्हैसाळ कॉलेज (म्हैसाळ, जि. सांगली) : ७५ हजार रू.
- कला वाणिज्य कॉलेज (कोयनानगर, जि. सातारा): ७५ हजार रू.
- राजमती पाटील कन्या कॉलेज (नेमिनाथनगर, सांगली: ७५ हजार रू.

